# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५**

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ९**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एस-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**रूपये:- ७,२९,१३,०३,०००/-**<br>**श्री. रोहित पाटील** |
| (१) | ६६० | १०० | राज्यातील सर्व शासकीय रुग्णालये, उप रुग्णालये व गाव स्तरावरील शासकीय दवाखान्यात रुग्णांना गरजेनुसार औषधांचा असलेला तुटवडा असणे, सर्व सरकारी रुग्णालयात गरजेनुसार औषध पुरवठा करण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी औषध भांडार असण्याची आवश्यकता, जिल्हा रुग्णालयाला औषध खरेदीसाठी शासकीय परवानगीसाठी विलंब लागत असल्याने रुग्णांची होणारी गैरसोय न होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ६६१ | १०० | राज्यात विशेषतः सांगली जिल्ह्यामधील अनेक रुग्णालयात कायमस्वरूपी आस्थापनेवर डॉक्टर नसल्याने रुग्णांची होणारी गैरसोय त्यामुळे खाजगी दवाखान्यात उपचारासाठी रुग्णांना बसलेला आर्थिक भुर्दंड, तात्पुरत्या नेमणुकीकडे डॉक्टरांनी कानाडोळा केल्याने त्याचा रुग्णांच्या आरोग्यावर होणारा परिणाम सतत वैद्यकीय अधीक्षकांच्या जागा रिक्त राहिल्याने शासनाकडून याची दखल न घेणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३) | ६४८ | १० | संभाजीनगर घाटी रुग्णालयामध्ये क्यूरेक्सिम-२०० या औषधीसह इतरही बनावट औषधीचा मोठ्या प्रमाणात पुरवठा करण्यात आला असून ही बनावट औषधी अनेक रूग्णांना देण्यात आली असून क्यूरेक्सिम-२०० या औषधीसह अनेक बनावट औषधाचा पुरवठा रुग्णालयात करण्यात आला असल्याची घटना माहे फेब्रुवारी २०२५ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली होती तसेच अंबाजोगाई येथील स्वाराती वैधकीय महाविघालयात सुध्दा ३३ प्रकारचे बनावट औषधांचा पुरवठा करण्यात आला होता त्या घटनेतील जबाबदार विशाल एन्टरप्रायझेसने किमान ३३ प्रकारच्या बनावट औषधीचा पुरवठा राज्यातील विविध मेडीकल कॉलेजमध्ये केला असल्यामुळे, हया रॅकेटनी मोठया प्रमाणात बनावट औषधांचा पुरवठा मेडीकल कॉलेजमध्ये करित असतांना सुध्दा याकडे वैद्यकीय अधिकाऱ्यांसह, डीनने दुलर्क्ष करून शासनाची लाखो रूपयांची फसवणूक केली असणे, त्यामुळे या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी कडक नियम करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | ६५५ | १० | उमरेड मध्ये ४० किलोमीटर लांब सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल उपलब्ध नसणे, नागपूर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आधीच्याच रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असल्याने त्यामुळे सर्व सामान्य रुग्णांना अनेक अडचणीचा सामना करावा लागणे, नागपूर येथील शासकीय रुग्णालयात, नागपूर ग्रामीण क्षेत्रकरिता किंवा त्या भागातील रुग्णांकरिता स्वतंत्र अद्यावत विविध कक्ष स्थापन करून त्यांच्या करिता राखीव ठेवण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (५) | ४०८ | १० | राज्यात नवीन शासकीय वैघकीय महाविघालयला मान्यता देणे, मात्र यापुर्वी राज्यात सुरू असलेल्या शासकीय महाविद्यालयांतील शिक्षकांची तब्बल ४१ टक्के पदे रिक्त असल्याचे माहे फेब्रुवारी २०२५ रोजी व त्या सुमारास निर्देशनास येणे, राज्यातील प्रत्येक जिल्हयात एक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असावे असे शासनचे धोरण असणे, सध्या राज्यात ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये असून या रूग्णालयातील प्राध्यापकासह कर्मचाऱ्यांची मोठया प्रमाणात पदे रिक्त असणे, हे रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाकडून कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे, नवीन १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये यंदा सुरु होणे, त्यात १०० विद्यार्थीसंख्या असलेली ८ व ५० जागा असलेली दोन महाविद्यालये असणे, रिक्त पदांच्या अनुशेषामुळे तातडीने भरण्यासाठी व महाविद्यालयांत आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (६) | ६२९ | १० | शासकीय वैद्यकीय रुग्णालय, लातूर व नांदेड शासकीय वैद्यकीय रुग्णालयात “मोक्स” प्रति जैविकांच्या (ॲन्टी बायोटीक) नावाच औषध बनावत असल्याचे दिसू२न आले असणे, MAXMAD250 हे औषध ही बनावत असून संबंधित कंपनीवर कोणतीच कार्यवाही केली नसणे, गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरीकांनी की असणे, या प्रकरणाची व राज्यातील इतर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ६३० | १० | धुळे जिल्हातून ३ प्रमुख राष्ट्रीय महामार्ग जात असणे, त्यामुळे वाहतूक मोठया प्रमाणावर वाढली असल्याचे दिसून येणे, महामार्गामुळे अपघातचे प्रमाण वाढले असून रुग्ण वाढण्याचे निदर्शनास आले असणे, धुळे जिल्हयासह नंदूरबार, मालेगाव, जळगाव इत्यादि ठिकाणाहून विविध रुग्ण येत असणे, तसेच अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना तात्काळ वैद्यकीय सेवा देणे आवश्यक असणे, श्री. भाऊसाहेब हिरे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात National Programme For Prevention & Burn Injuries अंतर्गत ट्रामा केअर हॉस्पिटल सुरु करण्याची गरत निर्माण झाली असणे, त्याचप्रमाणे केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री स्वास्थ सुरक्षा येजना सुरु करणे, तसेच धुळे येथे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करणे, सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल सुरु करण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनाने दिनांक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | २३ जानेवारी,२०२५ रोजी मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला असणे, मात्र केंद्र शासनाने अद्याप मंजूरी दिली नसणे, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एस-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १७,२८,८१,२५,०००/-**<br>**श्री. रोहित पाटील** |
| (८) | ६५७ | १०० | मिरज मेडिकल वैद्यकीय विभागाची जागा तासगांव नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याच्या बदल्यात, नगरपालिकेने उर्वरित जागेवर भव्य हॉस्पिटलची इमारत उभारली. मात्र, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे या इमारतीचा अद्याप उपयोग झाला नाही. जागेच्या कमतरतेमुळे वैद्यकीय दवाखाना, मॅटरनिटी होम आणि नर्सिंग ट्रेनिंग यांसारख्या सेवा बंद ठेवण्यात आल्या आहेत. या नवीन इमारतीचा उपयोग करून या सुविधा त्वरित सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ६५९ | १०० | मिरज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शासनाकडून अनेक सेवा सुविधा करण्याचा प्रयत्न चालू असताना ऑर्गन रिट्रीव्हलची ही सुविधा केल्यास त्याचा अनेक रुग्णांना फायदा होऊन अवयव ट्रान्सप्लांट सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २० मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई